ईच्छा आणि अपेक्षा मर्यादित असल्या की स्वाभिमान विकण्याची वेळ येत नाही.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शुक्रवार १ ऑगस्ट २०२५ | अंक २२३ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# सांगली-कोल्हापूर जिल्ह्यांसाठी धोका, अलमट्टी धरणाची उंची वाढवू नका, मुख्यमंत्र्यांचे केंद्रीय मंत्र्यांना पत्र

कर्नाटकमधील अलमट्टी धरणामुळे महाराष्ट्रात पूरस्थिती निर्माण होण्याचा नेहमीच धोका असतो. अशातच अलमट्टी धरणाची उंची वाढवण्याचा निर्णय कर्नाटक सरकारने घेतला आहे. याला विरोध करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय जलशक्ती मंत्री सीआर पाटील यांना पत्र लिहिले आहे. याद्वारे मुख्यमंत्र्यांनी अलमट्टी धरणाची उंची वाढवू नये अशी विनंती केली आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे केंद्रीय जलशक्ती मंत्री सीआर पाटील यांना पत्र लिहिले आहे. या पत्रात मुख्यमंत्र्यांनी धरणाची उंची वाढल्यास सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यात पूर परिस्थिती गंभीर होण्याची शक्यता वाढू शकते. सध्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हायड्रोलॉजी, रुरकी यांच्याकडून बॅक वॉटर आणि पूरस्थितीवर अभ्यास सुरू आहे. अहवाल येईपर्यंत उंची वाढविण्याचा निर्णय अविवेकी ठरेल असं मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटलं आहे. अलमट्टी धरणाच्या पाण्यामुळे कृष्णा नदी आणि तिच्या उपनद्यांच्या पात्रात गाळ साचण्याचे



प्रमाण वाढले आहे. त्याचा परिणाम नद्यांच्या पाणी वाहून नेण्याच्या क्षमतेवर झाला आहे. यामुळे पुराचे पाणी ओसरण्याची गती संथ झाली आहे. याशिवाय बंधाऱ्यामध्येही मोठ्या प्रमाणात गाळ साचू लागला आहे. या सगळ्याचा एकत्रित परिणाम म्हणून महाराष्ट्रातल्या अनेक भागात पूर परिस्थिती निर्माण होऊ लागली आहे. कर्नाटक सरकारचा अलमट्टी धरणाची उंची 519.6 मी. वरून 524.256 मी. करण्याचा प्रस्ताव आहे. यामुळे कृष्णा नदीतही या काळात सातत्याने सहा मीटर पाणी थांबणार आहे. यामुळे पूरस्थिती आणखी गंभीर आणि भयावह होईल. यातून सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील हजारो नागरिकांना, तसेच पिकाऊ शेत जमिनीला फटका बसणार आहे. या सर्वांचा विचार करता, दोन्ही राज्यातील कृष्णा नदी काठच्या गावांचा आणि नागरिकांच्या हितासाठी, त्यांच्या जिविताचे, मालमत्तेचे आणि उदरनिर्वाह साधनांच्या रक्षणाचा उपाय म्हणून अलमट्टी धरणाच्या उंची (पूर्ण जलाशय पातळी) वाढविण्याच्या निर्णयाचा कर्नाटक शासनाने पुनर्विचार करावा, याकरिता त्यांना निर्देश देण्यात यावेत, अशी विनंती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. आता यावर केंद्रीय मंत्री सीआर पाटील काय निर्णय घेणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

# कुठलेही ठोस पुरावे नाहीत, सर्व सात आरोपींची निर्दोष सुटका, मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणी कोर्टाचा निकाल

मु ंबई। प्रतिनिधी महाराष्ट्रासह संपूर्ण देशाचं लक्ष लागून राहिलेल्या २००८ मधील चरश्रशसरेप इेल इश्ररीं प्रकरणात सर्व आरोपींची निर्दोष सुटका करण्यात आली आहे. भाजपच्या माजी खासदार साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर, लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित, निवृत्त मेजर रमेश उपाध्याय, अजय राहिरकर, सुधाकर द्विवेदी, समीर कुलकर्णी, सुधाकर चतुर्वेदी या सातही आरोपींची सुटका झाली आहे. निर्दोष मुक्त झालेल्या सर्वांनीच १७ वर्षांनी पुनर्जन्म झाल्याच्या भावना व्यक्त केल्या. समीर कुलकर्णींना कोर्टातच अश्रू अनावर झाले. आरोपींचे वेगवेगळ्या कायदेशीर मुद्द्यांवर एकामागोमाग अर्ज, बॉम्बे हायकोर्ट ते सुप्रीम कोर्टातील अपिले, तपास संस्थांमधील बदल, खटल्याची सुनावणी करणाऱ्या न्यायाधीशांच्या बदल्या यासारख्या विविध कारणांमुळे दीर्घकाळ रखडपट्टी झालेल्या मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणाचा निकाल अखेर १७ वर्षांनी आज, गुरुवारी जाहीर झाला. लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित याने काश्मीरमधून आरडीएक्स आणले आणि त्याने त्याच्या घरी बॉम्ब तयार केला, याचे कुठलेही पुरावे आढळले नाहीत. आरोपी साध्वी प्रज्ञासिंह ठाकुर हिच्याकडे त्या मोटारसायकलचा त्यावेळी ताबा होता, हे सरकारी पक्षाला सिद्ध करता आलेले नाही. तो बॉम्ब त्या मोटारसायकलमध्येच लावलेला होता, असेही निर्विवादपणे सिद्ध होऊ शकलेले नाही. याशिवाय चरश्रशसरेप इेल इश्ररीं घडवण्यासाठी बैठका झाल्या ते देखील सरकारी पक्षाला सिद्ध करता आलेले नाही, असे निरीक्षण कोर्टाने निकालात नोंदवले.२९ सप्टेंबर २००८ रोजी रात्री ९ वाजून ३५ मिनिटांनी रमझान महिन्यातच, मालेगावमधील मशिदीजवळ एलएमएल फ्रीडम मोटारसायकलमध्ये लावलेल्या बॉम्बचा भीषण स्फोट होऊन हाहाकार उडाला होता.

# जरांगे पाटील व महादेव मुंडे कुटुंबीयांच्या उपस्थित होत असलेल्या बैठकीला उपस्थित रहा-आ.संदीप क्षीरसागर

बीड। प्रतिनिधी स्व.महादेव मुंडे यांचे कुटुंबीय न्यायाच्या प्रतिक्षेत आहेत. त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी बीड येथे संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत होत असलेल्या बैठकीस मी येत आहे, तुम्हीही या असे आवाहन आमदार संदीप क्षीरसागर यांनी केले आहे. परळी येथील स्व.महादेव मुंडे यांची हत्या होऊन २० महिने उलटले आहेत. १८ महिन्यांपासून आरोपी कोण याचाच पोलीसांना शोध लागलेला नाही. स्व.महादेव मु ंडे यांची, स्व.संतोष देशमुख यांच्याप्रमाणेच निघृण हत्या करण्यात आली होती. अतिशय गंभीर प्रकरण असतानाही पोलीस आणि सरकार मूग गिळून गप्प आहेत. न्यायासाठी स्व.महादेव मुंडे यांच्या पत्नी सातत्याने आंदोलन करत आहेत. काही दिवसांपूर्वी तर अक्षरशः त्यांनी बीड पोलीस अधीक्षकांच्या कार्यालयासमोर आंदोलन करत विष प्राशन केले होते. जर न्यायाच्या मागणीसाठी आपल्या एका भगानिला विष प्राशन करण्याची वेळ येत असेल तर ही लाजिरवाणी बाब आहे. त्यामुळे स्व.महादेव मु ंडे यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी रस्त्यावर उतरल्याशिवाय पर्याय नसून आता स्व.संतोष देशमुख हत्याप्रकरणात न्यायासाठी ज्याप्रकारे आंदोलन केले होते त्याचप्रकारे आंदोलन उभे करावे लागणार आहे.




# अँड. राज पाटील यांना ग्रामरत्न सरपंच पुरस्कार प्रधान

## लोणावळा येथे विविध मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण सोहळा संपन्न

वडवणी बीड प्रतिनिधी अंकुश गवळी - अखिल भारतीय सरपंच परिषद महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दरवर्षी दिला जाणारा ग्रामरत्न सरपंच राज्यस्तरीय पुरस्कार यंदा उडवणी तालुक्यातील मौजे तीगांवचे कार्यनिष्ठ सरपंच तथा समाजसेवक व लढा दुष्काळाशी या फाउंडेशनचे सर्वासर्वे अँड. राज पाटील यांना प्रदान करण्यात आला आहे. लोणावळा येथे नुकताच विविध मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. या पुरस्काराबद्दल अँड. राज पाटील यांचे सर्व स्तरातून स्वागत, अभिनंदन व सत्कार करून कौतुक केले जात आहे. अँड.राज पाटील हे सध्या वडवणी तालुक्यातील मौजे तिगांवचे सरपंच आहेत. या सरपंच पदाच्या माध्यमातून गावातील सर्वांगीण विकास करत गांवचे नाव विकासात्मक पटलावर घेऊन जाण्याचा मानस राज पाटील करत आहेत. त्याबाबत अनेक योजना आणून त्या जनतेसाठी विकसित केल्या आहेत. तसेच लढा दुष्काळाशी या फाउंडेशनचेते संस्थापकीय अध्यक्ष असून या माध्यमांतून अनेक सामाजिक उपक्रम राबवून समाजहिताचे कार्य केले आहे. या कार्याची दखल घेऊनच अखिल भारतीय सरपंच परिषद महाराष्ट्र राय यांच्या वतीने यंदाचा हा पुरस्कार सरपंच




तथा लढा दुष्काळाशी या फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा समाजसेवक अँड. राज पाटील यांना प्रदान करण्यात आला असून बीड जिल्ह्यातील ते एकमेव या पुरस्कारासाठी मानकरी ठरले आहेत. हा पुरस्कार ३० जुलै रोजी पुणे जिल्ह्यातील लोणावळा या ठिकाणी प्रदान करण्यात आला आहे. हा पुरस्कार ज्येष्ठ अभ्यासू इतिहासकार डॉ. श्रीमंत कोकाटे सर, माजी विभागीय आयुक्त पुणे चंद्रकांतजी दळवी सर IAS ,आनंद पाटील, जयंत पाटील साहेब (अध्यक्ष -अखिल भारतीय सरपंच परिषद) इत्यादी मान्यवरांच्या शुभहस्ते पुरस्कार देण्यात आला आहे. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल पाटील यांचे सर्वस्तरातून स्वागत व अभिनंदन होत आहे.

# कु.भाग्यश्री सगट हिचे वक्तृत्व स्पर्धेत यश




अ ंबाजोगाई -प्रतिनिधी तालुक्यातील देवळा येथील विश्वरुपी माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी कु. भाग्यश्री सगट हिने वसंतराव नाईक माध्यमिक विद्यालय, वरवटी येथे संपन्न झालेल्या वक्तृत्व स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला. दि. २९ जुलै रोजी पार पडलेल्या या वक्तृत्व स्पर्धेत मभारतीय स्वातंत्र्य संग्रामातील एका क्रांतिकारकाचे योगदानफ या विषयावर तिने अत्यंत प्रभावीपणे आपले विचार व्यक्त करून उपस्थितांची व परीक्षकांची मने जिंकली. रूपये तीन हजार पारितोषिक देवून आयोजकांच्या वतीने तिला सन्मानित करण्यात आले. यासाठी तिला शाळेतील शिक्षक हनुमंत आपेट यांनी मार्गदर्शन के ले. तिच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव राजेंद्र लोमट े, उपाध्यक्ष सतीश लोमट े, शाळेचे मुख्याध्यापक खोसे एस.जे, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी व ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त (५१ जणांचे) रक्तदान शिबिर संपन्न

## तिरुपती हॉस्पिटल आणि महाराजा मित्र मंडळाचें रक्तदान करून लोकशाहीरांस अभिवादन

बीड प्रतिनिधी साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या 105 व्या जयंतीनिमित्त बीड शहरात सामाजिक संदेश देण्यासाठी तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल आणि महाराजा मित्र मंडळ बीडच्या वतीने भव्य रक्तदान शिबिर आणि अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते लोकशाहीर अभिवादन करण्यात आले त्यानंतर महाराजा मित्र मंडळ आणि तिरुपती हॉस्पिटल कर्मचारी यांनी मोठ्या प्रमाणात रक्तदान करून सामाजिक उपक्रम पार पाडला. या सामाजिक उपक्रमाला उपस्थित तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल






चे सर्वेसर्वा सुप्रसिद्ध मनकाविकार तज्ञ डॉ बालाजी नवले साहेब, जिल्हा रुग्णालय अतिरिक्त शल्य चिकित्सक डॉ सदाशिव राऊत साहेब, महाराजा मित्र मंडळाचे आकाश भैय्या कंडेरे,लकी भैया कंडेरे, यूवा नेते भारत आण्णा कांबळे, प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ निलेश मिसाळ साहेब,प्रसिद्ध कान नाक घसा तज्ञ डॉ राहुल दुबाले साहेब, माजी सरपंच हरी पवार, कर्जनीचे सरपंच अंकुश गायकवाड, श्रीमती गायकवाड, डॉ महादेव लहाने इत्यादी प्रमुख पाहुणे उपस्थित होते तर रक्तदाते म्हणून विशाल चांदमारे, नाना गोडसे, कार्तिक वाघमारे,निखिल सानप विष्णूबाळ झोडगे,अंगद बहिर, पवन ढाकणे, सचिन मरकुटे, आदित्य तांगडे, शुभक पालवनकर,मिनीनाथ मुंडे सोमनाथ मुंडे ,खेडकर, कुणाल, रोहित जाधव, इतर रक्तदात्यांनी सहकार्य करून कार्यक्रम यशस्वी केला तसेच महाराजा मित्र मंडळाचे लकी भैय्या कंडेरे, यांच्यासह सर्व मित्र परिवाराने रक्तदान आणि कार्यक्रमास सहकार्य करून लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती निमित्त घेण्यात आलेल्या या सामाजिक उपक्रमाला उपस्थिती लावून, तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलच्या आवारात लोकशाहीच्या जयंतीनिमित्त जयघोष ऐकण्यात आला..!

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार १ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



सं पा द की य

# मोबाईलमुळे विद्यार्थ्यांच्या वाचन क्षमतेवर परिणाम

आजकाल मोबाईलच्या वाढत्या वापरामुळे विद्यार्थ्यांच्या पुस्तक वाचन क्षमतेत लक्षणीय घट झाली आहे, ही एक गंभीर समस्या आहे. एकेकाळी विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृध्दीचे आणि शब्दसंग्रहाचे मुख्य साधन असलेली पुस्तके आता मोबाईलच्या तुलनेत दुय्यम ठरत आहेत. यामुळे विद्यार्थ्यांवर अनेक नकारात्मक परिणाम होत आहेत, जे त्यांच्या शैक्षणिक आणि भविष्यातील विकासासाठी चिंतेचा विषय आहेत.

मोबाईलवर वेळ घालवताना विद्यार्थी अनेकदा लहान आणि संक्षिप्त मजकूर वाचतात, ज्यामुळे त्यांच्या दीर्घकाळ वाचनाची सवय कमी होते. पुस्तके वाचताना लागणारी एकाग्रता आणि चिंतनशक्ती मोबाईलच्या वापरामुळे कमी होते. परिणामी, विद्यार्थ्यांचा शब्दसंग्रह अपुरा राहतो. नवनवीन शब्दांशी त्यांची ओळख होत नाही आणि त्यांना विविध भाषेच्या शैलींचा अनुभव मिळत नाही. यामुळे त्यांची अभिव्यक्ती क्षमता देखील प्रभावित होते. पुस्तके वाचल्याने विद्यार्थ्यांचे सामान्य ज्ञान वाढते. इतिहास, भूगोल, विज्ञान, साहित्य आणि इतर अनेक विषयांची माहिती त्यांना पुस्तकांमधून मिळते. मात्र, मोबाईलच्या अतिवापरामुळे विद्यार्थी अनेकदा मनोरंजक आणि क्षणिक माहितीमध्ये रमतात, ज्यामुळे त्यांना गंभीर आणि उपयुक्त सामान्य ज्ञानाची ओळख होत नाही. यामुळे ते अनेक महत्त्वाच्या घडामोडींविषयी आणि माहितीविषयी अनभिज्ञ राहतात. पालक देखील ब–याच वेळी मुलांकडून होणारी कटकट शांत होण्यासाठी, मुलांना शांत बसण्यासाठी स्वःहून मुलांच्या हातात मोबाईल देतात. मुलांना मोबाईलची सवय पडते आणि नंतर पालकांसाठी हा विषय त्रासदायक ठरतो. मुलं मोबाईलच्या अतिआहारी गेल्याचे कारण पुढे केले जाते आणि आरोपीच्या पिंजऱ्यात आज मुलांना उभे केले जाते. मात्र आजही ब–याच घरांमधील वयस्कर, सुज्ञ व जबाबदार व्यक्ती सुध्दा दिवसातील सोळा–सतरा तास मोबाईलमध्ये व्यस्त असतात. बरीच ज्ञानी, जाणकार, पंडित व्यक्ती मोबाईलवर तीन–चार तास सतत बोलताना जाणवतात मग लहान मुलांनी अशा महानुभवांकडून तरी काय आदर्श घ्यावा? बरे, कोणाला दिवसभरात किती वेळा फोन करायचा? एकाच व्यक्तीशी दिवसभरात किती वेळा बोलायचे? यालाही काही मर्यादा हव्यात ना! उगाच मोबाईलच्या वापराचे खापर केवळ मुलांवर फोडून चालणार नाही.

जर विद्यार्थ्यांचा शब्दसंग्रह कमी असेल आणि त्यांना वाचनाची सवय नसेल, तर भविष्यात लेखक, कवी आणि साहित्यिक कसे निर्माण होतील, हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. साहित्य निर्मितीसाठी कल्पनाशक्ती, विचारांची खोली, भाषेवरील प्रभुत्व आणि विस्तृत शब्दसंग्रह यांची आवश्यकता असते. हे गुण वाचनाने विकसित होतात. जर वाचनच कमी झाले, तर या गुणांचा विकास खुंटू शकतो, ज्यामुळे भविष्यात दर्जेदार साहित्य निर्मिती होण्याची शक्यता कमी होते. ही सांस्कृतिक आणि बौध्दिकदृष्ट्या मोठी हानी ठरू शकते. पुस्तकाची भाषा मुलांच्या पचनी पडत नाही परंतु मोबाईलची भाषा मुलांना लवकर कळते.

पालकांनी मुलांना मोबाईलऐवजी पुस्तके वाचण्यासाठी प्रोत्साहित करावे आणि त्यांना वाचनासाठी योग्य वातावरण निर्माण करून द्यावे. शाळांनी वाचनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगावे, वाचन स्पर्धा आयोजित कराव्यात आणि ग्रंथालयाचा वापर वाढवण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. ई–पुस्तके आणि ऑडिओबुक्स यांसारख्या डिजिटल वाचन साधनांचा वापर वाढवता येऊ शकतो, जेणेकरून विद्यार्थी तंत्रज्ञानाचा वापर करूनही वाचनाची सवय कायम ठेवू शकतील.

मोबाईल वापरासाठी वेळ निश्चित करणे आणि तो मर्यादित ठेवणे आवश्यक आहे, जेणेकरून मुलांना वाचनासाठी आणि इतर रचनात्मक कामांसाठी पुरेसा वेळ मिळेल. या उपाययोजनांमुळे विद्यार्थ्यांना पुन्हा वाचनाकडे वळवता येईल आणि त्यांचे भविष्य अधिक समृध्द होऊ शकेल.

राजेंद्र चौधरी.
रोझोदा. ता. रावेर. जि. जळगाव
मो. ७७००९८२७६५

# अशोक डकांनी विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या उमेदवाराच्या विरोधात काम केले

## - विधानसभा अध्यक्ष व तालुकाध्यक्षांची पक्षाध्यक्ष अजित पवारांकडे तक्रार

माजलगाव, प्रतिनिधी प्रथिनिधी दि. 30 प्रतिनिधी: येथील अशोक गोविंदराव डक यांनी विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या उमेदवारांच्या विरोधात काम केले असल्याने त्यांचेवर कारवाई करावी तसेच पक्षाच्या नेत्याचे फोटो व पक्षाचे चिन्ह वापरण्यास मनाई करून पक्षातुन हकालपट्टी करावी अशी मागणी मतदारसंघाचे विधानसभा अध्यक्ष व मतदार संघातील तालुकाध्यक्षांनी राष्ट्वादी कॉग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांचेकडे केली आहे. दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, अशोक डक यांनी २२९ माजलगाव विधानसभा मतदारसंघ ता. माजलगाव जि. बीड येथील



राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार यांच्या विरोधात काम केले असून आता पक्ष सत्तेत आल्यानंतर ना. अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त पेपर ला जाहिराती देवुन घड्याळाचे चिन्ह जाहिरातीत टाकले आहे. तसेच ना. अजित पवार हे माजलगाव विधानसभा मतदारसंघात प्रचार सभेसाठी आले असतांना तत्कालीन मुंबई बाजार समितीचे सभापती अशोक डक होते. पदावर असतांना देखील यांनी त्यावेळेस पेपरला जाहिरात दिली नाही, स्वागताचे होल्डींग बॅनर लावले नाही. व आता सभेकडे फिरकल देखील नाहीत, ना. अजित पवार यांच्या वाढदिवसाचे शहरभर होल्डींग लावुन व पेपरला जाहिरात देवुन मी स्वतः पक्षाचा नेता असल्याचे भासवत आहे. व माझी कधी न संपणारी प्रेरणा ना. अजित पवार आहेत असे भासवत आहेत. यामुळे पक्षाच्या स्थानिक कार्यकत्यामध्ये संभ्रम निर्माण करण्याचे काम करत आहे. त्यामुळे अध्यक्षानी याची दखल घेवुन संबंधित व्यक्तीस पक्षाचे चिंन्ह व पक्षाच्या नेत्याचे फोटो वापरण्यास मनाई करावी व पक्षातुन कायमस्वरूपी हकालपट्टी करावी अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनावर माजलगाव विधानसभा अध्यक्ष जयदत्त नरवडे, तालुकाध्यक्ष संभाजी शेजुळ, धारूर तालुकाध्यक्ष अमोल जगताप, वडवणी तालुकाध्यक्ष महादेव साबळे यांच्या स्वाक्षरी आहेत.

# जॉय दिवाळी विशेषांकसाठी साहित्य पाठविण्याचे आवाहन

वैभव पाटील मुंबई प्रतिनिधी जॉय सामाजिक संस्थेच्या वतीने यंदा प्रथमच दिवाळी विशेषांकाचे प्रकाशन करण्यात येणार आहे. जॉयच्या कार्याची ओळख अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावी व नवोदित लेखकांना व्यासपीठ उपलब्ध व्हावे ह्या उद्देशाने दिवाळी अंकाची संकल्पना आखण्यात आलेली आहे. या अंकात जॉयच्या सभासदांनीदेखील लिहिते व्हावे अशी अपेक्षा आहे. दिवाळी अंकात ललित लेख, प्रवास वर्णने, कविता, विनोद, कथा, लघुकथा, ग्रामीण भाषेतील साहित्य, व्यक्तीविशेष अशा साहित्याचा समावेश असणार आहे. त्याचबरोबर ह्या दिवाळी विशेषांकात आपल्याला नाममात्र दरात आपली वा आपल्या व्यवसायाची दिवाळी शुभेच्छा जाहिरात फोटोसह देता येणार आहे. २०२५ च्या दीपावली निमित्त जॉयच्या वतीने पहिल्यांदाच प्रकाशित होणारा दिवाळी अंक सर्वसमावेशक, आकर्षक व उत्कंठतावर्धक असणार आहे व यात सर्वच जॉय सभासद व हितचिंतकांनी सहभाग घ्यावा असा आमचा आग्रह राहील. आपले साहित्य joyofgivingmumbai@gmail.com या ईमेलवरच दिनांक १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत पाठवावे. निवडक, उत्तम, दर्जेदार, नाविन्यपूर्ण साहित्याचा समावेश दिवाळी अंकात केला जाईल. जाहिरातीसाठी व अधिक माहितीसाठी गणेश हिरवे (9920581878) किंवा वैभव पाटील (9819112885) यांचेशी संपर्क करावा.

## नीती आयोगाच्या संपूर्णता अभियानात उल्लेखनीय प्रगतीमध्ये किनवटचा समावेश

# जिल्हाधिकाऱ्यांचा नीती आयोग व राज्य शासनाच्या वतीने २ ऑगस्ट रोजी नागपूर येथे सन्मान

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : नीती आयोगाच्यावतीने जुलै ते सप्टेंबर 2024 या कालावधीत राबविण्यात आलेल्या संपूर्णता अभियानात आकांक्षित किनवट तालुक्याने 6 निर्देशकांपैकी 4 निर्देशक 100 टक्के पूर्ण केल्यामुळे राज्यातुन तिसऱ्या क्रमांकाचे स्थान पटकाविले आहे. याबद्दल राज्य शासनाच्यावतीने जिल्हाधिकारी राहुल कर्डीले आणि तत्कालीन जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांचा आयआयएम नागपूर येथे 2 ऑगस्ट 2025 रोजी पदक व प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात येणार आहे. नीती आयोगाच्या आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत जुलै ते सप्टेंबर 2024 या कालावधीत संपूर्णता अभियान राबविण्यात आले. देशभरातील 500 तालुके यात सहभागी झाले. या अभियानात आरोग्य, पोषण, कृषी आणि सामाजिक विकास या क्षेत्रांतर्गत 6 निर्देशकांचा समावेश करण्यात आला होता. संपूर्णता अभियानात राज्यातील 27 आकांक्षित तालुक्यानी सहभाग घेतला होता. यात पहिल्या क्रमांकावर चंद्रपूर - जिवती, दुसऱ्या क्रमांकावर वाशीम - मालेगाव, पालघर - जवाहर तर तिसऱ्या क्रमांकावर नांदेड-किनवट, वर्धा - कारंजा, यवतमाळ-पुसद, गडचिरोली-





अहेरी, नंदुरबार-अकराणी या आकांक्षित तालुक्यानी स्थान पटकाविला आहे. तालुक्यातील गर्भवती महिलांचे पहिल्या तिमाहीतील नोंदणीचे प्रमाण 100 टक्के करणे. तालुक्यातील 30 पेक्षा जास्त वय असलेल्या व्यक्तींची उच्च रक्तदाब संदर्भात 100 टक्के तपासणी करणे. तालुक्यातील 30 पेक्षा जास्त वय असलेल्या व्यक्तींची मधुमेह संदर्भात 100 टक्के तपासणी करणे. तालुक्यातील गर्भवती महिलांना आयसीडीएसच्या पूरक पोषण आहार वितरण कार्यक्रमांतर्गत 100 टक्के पूरक पोषण आहाराचे वितरण करणे. मृदा आरोग्य तपासणी कार्ड 100 टक्के वितरण करणे. तालुक्यातील महिला स्वयं सहायता समूहाना खेळत्या भांडवलाचे 100 टक्के वितरण करणे. संपूर्णता अभियानात किनवट तालुक्याची कामगिरी संपूर्णता अभियानाच्या माध्यमातून आकांक्षित किनवट तालुक्याने तालुक्यातील लक्ष्यित लोकसंख्येच्या तुलनेत मधुमेहासाठी तपासणी, उच्च रक्तदाबासाठी तपासणी, आयसीडीएस कार्यक्रमांतर्गत नियमितपणे पूरक पोषण आहार घेणाऱ्या गर्भवती महिलांची टक्केवारी आणि माती नमुना संकलन लक्ष्याविरुद्ध तयार केलेल्या मृदा आरोग्य कार्डांची टक्केवारी हे 4 निर्देशक 100 टक्के संतृप्त केले आहेत. या अभियानात तालुक्याने संपूर्णता प्रतिज्ञाद्वारे मोहिमेची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी निर्धारित वचनबद्धता 6 पैकी 4 निर्देशक संतृप्त करून यात उल्लेखनीय प्रगती केल्याबद्दल राज्य शासनाच्यावतीने जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, तत्कालीन जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांचे आय आय एम नागपूर येथे 2 ऑगस्ट 2025 रोजी पदक व प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात येणार आहे. यासाठी जिल्हाधिकारी यांच्या समवेत आकांक्षित तालुका किनवटचे गटविकास अधिकारी ज्ञानेश्वर टाकरस व संबंधित आकांक्षित तालुका फेलो हे राज्यस्तरीय सत्कार समारंभासाठी उपस्थित राहणार आहेत.अभियान मोहिमेत योगदान दिलेल्या संबंधित तालुक्यातील गटविकास अधिकारी यांना पदक व प्रशस्तीपत्र तर तालुका कृषी अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी व बाल विकास प्रकल्प अधिकारी आणि संबंधित विभागाचे गाव पातळीवर उल्लेखनीय काम केलेल्या कर्मचारी यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात येणार आहे.

# ज्येष्ठ शिक्षकाचा अभूतपूर्व सन्मान

राष्ट्रीय केमिकल्स एण्ड फर्टिलायझर्स लि. कंपनीच्या थळ कारखान्याचे किहिम येथील स्वागत गेस्ट हाऊस ! दिवस गुरुपौर्णिमा! खरं तर गुरुप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस. अर्थातच हा दिनांक १० जुलै २०२५ दिवस, एका अभूतपूर्व अशा चांगल्या घटनेचा साक्षीदार ठरला. ८६ वर्षांचे आदरणीय बलबीर अधिकारी सर यांनी एकेकाळी सेवेत असतानाच युवा कार्याबरोबरच कंपनीच्या माध्यमातून गरजू, अनाथ, मागासवर्गीय मुलांना शिक्षणासाठी दत्तक घेतले. त्यांना घडवले. त्या माजी विद्यार्थ्यांनीच आपल्या गुरूंचा आपले कुटुंबीय, आई-वडील यांच्या उपस्थितीत हृदयस्पर्शी सन्मान केला. योगायोग असा की गुरुपौर्णिमा हा श्री. अधिकारी सरांचा जन्मदिवसही. सहाजिकच या सोहळ्यास अभिष्टचिंतनाचेही स्वरुप प्राप्त झाले. खरे तर ! आपल्या देशात सुमारे ३०० सार्वजनिक उद्योग आहेत. काही ठिकाणी होतकरु विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊन गौरविले जाते. काही ठिकाणी प्रशिक्षण देऊन मुलाखतीद्वारे नोकरीत सामावले जाते. परंतु शिक्षण - प्रशिक्षण - नोकरी अशी योजना सतत २२ वर्ष यशस्वीरित्या सांभाळणारी राष्ट्रीय केमिकल्स एण्ड फर्टिलायझर्स लि. ही देशातील एकमेव केंद्रीय सार्वजनिक खत उद्योग कंपनी आहे. तिचे मुंबई (चेंबूर) व रायगड जिल्ह्यातील थळ येथे असे दोन कारखाने आहेत. सतत नफा होत असल्याने कंपनीला सरकारतर्फे नवरत्न सन्मान प्राप्त झाला आहे. चेंबूर, थळ कारखान्यांचा पाया मजबूत करण्याचे श्रेय कंपनीचे पहिले अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिलीप सिंह यांच्याकडे जाते. आरसीएफ विद्यार्थी वसतिगृह, हरित चेंबूर प्रकल्प व दत्तक ग्राम योजना ह्या योजनांमुळे समाजाच्या उन्नतीतही भर पडली हे सर्वमान्य सत्य आहे. आणि या योजनांचे मुख्य समन्वयक म्हणून समर्पित अशा निस्वार्थी भावनेने, कंपनीतील आपल्या कामातील प्रामाणिकपणा आणि शिस्तबद्ध अशा स्वच्छ प्रतिमेने या उपक्रमांचे उत्तमरीत्या काम पाहून श्री. बलवीर अधिकारी यांनी त्यास मूर्तरूप प्राप्त करून दिले, हेही तेवढेच निखळ सत्य. खरे तर आरसीएफ व्यवस्थापनाने हे मागासवर्गीय मुलांसाठींचे वसतीगृह कंपनीतील जनसंपर्क खात्याच्या स्वाधीन केले. श्री. बलवीर अधिकारी त्याच खात्यात काम करत असल्यामुळे आणि त्यांच्या कामातील सचोटीमुळे ही जबाबदारी त्यांच्याकडे आपोआप चालत आली. श्री. बलबीर अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली चेंबूर आणि थळ येथील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी कंपनीच्या प्रांगणात १९७८ साली सुरू झालेले हे वसतीगृह सुमारे वीस-बावीस वर्षे अविरत सुरू राहिले. दरवर्षी ३० मुले ही संख्या राखण्यासाठी नवीन मुले येत राहिली. एकूण संख्या ५०० च्या वर राहिली. यापैकी बहुतेकांची मुले उच्चशिक्षित झाली. या योजनेअंतर्गत अनेक दत्तक विद्यार्थ्यांचे शिक्षण पूर्ण करुन त्यांना प्रशिक्षण देत आपल्याच कंपनीत पूर्ण वेळ सामाऊन घेणे हा कंपनीचा मूळ उद्देश बहुतांशी सफल झाला. मध्ये बराच काळ निघून गेला तथापि बाहेर पडलेले विद्यार्थी व आरसीएफचा जनसंपर्क विभाग यात प्रामुख्याने बलबीर अधिकारी यांचा संपर्क कायम राहिला. याचे मुख्य कारण वसतीगृहात मिळालेले श्री. अधिकारी सरांचे संस्कारक्षम मार्गदर्शन, विद्यार्थ्यांना लाभलेल्या सोयी व घरासारखे वातावरण, आपुलकी व प्रेम तसेच १९७८ ते २००१ या कार्यकालात पदवीधारक, एनसीटीव्हीटी उत्तीर्ण, एम. ए., इंजिनियर्स, डॉक्टर, एल. एल. एम., कंपनीत मोठ्या पदावर अधिकारी पदावर हे युवक नोकरी करु लागले. यामुळे अनेक कुटुंबे सक्षमपणे उभी राहिली. म्हणूनच कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आरसीएफ माजी विद्यार्थी वसतीगृह संघटनेचे माजी विद्यार्थी यांनी गुरुवर्य श्री बलबीर अधिकारी यांचा सन्मान समारोह आणि अभिष्टचिंतन सोहळा आयोजित करुन तो यशस्वी केला. सदर सोहळ्याप्रसंगी कंपनीच्या कार्यपालक संचालक आणि महाव्यवस्थापक व निवृत्त उपजिल्हा अधिकारी विजय सोनार मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमासाठी परिसरातील अनेक पालक आवर्जून उपस्थित होते. ८६ वर्षे वयाच्या, आपल्या सर्वांगीण विकासाला हातभार लावणाऱ्या व्यक्तीला पाहण्यासाठी उत्सुक होते. सजल नेत्रांनी ते गुरूंकडे बघत होते. म्हणूनच अगदी भावपूर्ण झालेल्या या सोहळ्याप्रसंगी एक माजी विद्यार्थी मनोगतात म्हणाला की आम्ही आदिवासी, मागास वर्गातील आहोत पण शाळा - कॉलेजात जाऊ इच्छिणारे होतो. अधिकारी सरांनी आम्हाला आपलं केलं. आज आम्ही जे काही आहोत ते त्यांच्या सेवाभावी निर्णयामुळे. यातच सर्व काही आलं.

सुभाष हांडे देशमुख

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार १ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



# नामवंत वकील ॲड.सुनील कुलकर्णी (मोगरेकर) यांचे निधन



माजलगाव / प्रतिनिधी: शहरातील सुप्रसिद्ध वकील व नोटरी ॲड.सुनील मधुकरराव कुलकर्णी (मोगरेकर) यांचे निधन झाले. ते ६२ वर्षांचे होते. त्यांच्या निधनामुळे माजलगाव शहरात शोककळा पसरली आहे. ॲड.कुलकर्णी हे गेल्या अनेक दशकांपासून कायदाक्षेत्रात कार्यरत होते. आपल्या प्रामाणिक आणि सुसंस्कृत वृत्तीमुळे त्यांनी समाजामध्ये एक वेगळे स्थान निर्माण केले होते. ते विजया अर्बन मल्टीस्टेटचे व्यवस्थापक अनिल मोगरेकर आणि अभियंता सुरेश मोगरेकर यांचे बंधू होते. त्यांच्या पश्चात वृद्ध आई, पत्नी, एक विवाहित मुलगा, मुलगी, जावई, सून आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या अचानक जाण्याने कुटुंबीयांवर आणि मित्रपरिवारावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्यावर शहरात शोकाकुल वातावरणात मंगलनाथ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. विविध सामाजिक, व्यावसायिक व कायदेशीर क्षेत्रातील मान्यवरांनी निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

# मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसा निमित्त मकुणबी नोंदी शोध प्रशिक्षण मोहीम



परभणी (प्रतिनिधी): मराठा समाजातील बांधवांना कुणबी प्रमाणपत्र मिळविण्यासाठी मार्गदर्शन आणि सहाय्य करण्याच्या उद्देशाने, मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त मराठा प्रवाह समन्वय समितीच्या वतीने ङ्कुणबी नोंदी शोध प्रशिक्षण मोहिमेफचे आयोजन करण्यात आले आहे. या मोहिमेच्या कार्यालयाचे उद्घाटन १ ऑगस्ट रोजी शिवाजीनगर येथील जिल्हा कार्यालयात करण्यात येणार आहे. या उपक्रमाअंतर्गत परभणी जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात संपर्क कार्यालये स्थापन करण्यात येणार आहेत. कुणबी नोंदी कशा शोधाव्यात, मोडी लिपीचे प्राथमिक शिक्षण, नाव निश्चित झाल्यानंतर प्रमाणपत्रासाठी आवश्यक प्रक्रिया यांचे प्रशिक्षण या केंद्रांवर दिले जाणार आहे. यामुळे मराठा समाज बांधवांना कुणबी प्रमाणपत्र मिळविण्यात येणाऱ्या अडचणी दूर होतील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. समितीचा कार्यकाळ वाढविण्यात आला असून, भविष्यात नव्याने ज्या गावांमध्ये नोंदी उपलब्ध होतील, त्या गावांतील मराठा बांधवांना तत्काळ प्रमाणपत्र मिळावे यासाठी ही मोहीम उपयुक्त ठरणार आहे. यासाठी धाराजी भुसारे (९८२३१२५२२७), गजानन देशमुख (९८२२०८०११२), संदीप गव्हाणे (७०२०४६४३०५), मारोतराव इंगळे (९९२१५६२५४२) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या उपक्रमासाठी एकनाथ मोरे, उज्वला पाटील, सूर्यकांत मोगल, सोपान मोरे, विजय चट्टे, वैशाली जाधव, विशाल तनपुरे, गुणवंत सुरवसे, भास्कर झांबरे, रमेशराव भिसे यांनी आवाहन केले असून, जास्तीत जास्त मराठा बांधवांनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे

# श्री. विश्वनाथ गोपाळ पांचाळ यांना सांस्कृतिक व साहित्यरत्न पुरस्कार.

. मुंबईतील सुप्रसिद्ध साप्ताहिक आम्ही मुंबईकर वृत्तपत्राकडून सांस्कृतिक व साहित्य रत्न पुरस्कार अस्मिता विद्यालय जोगेश्वरी या ठिकाणी 27 जुलै 2025 रोजी पार पडला. यावेळी सुप्रसिद्ध साप्ताहिक आम्ही मुंबईकर चे संस्थापक संपादक फिल्म निर्माते,कवी ,लेखक श्री प्रमोद सूर्यवंशी सर व वसुधा नाईक उपसंपादक व या कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक अभिनेते श्री अजय बिरारी सर श्री.सागर पतंगे देशमुख,( फिल्म प्रोडक्शन मॅनेजर सिटी) कवी पाठ्य पुस्तकातील कवी लघुपट अभिनेते यांच्या हस्ते गांधी बाल मंदिर हायस्कूल कुर्ला येथील सहाय्यक शिक्षक ,एन सी सी ऑफिसर , बातमीदार श्री विश्वनाथ गोपाळ पांचाळ यांना प्र दान करण्यात आला या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शैल




सुतार ,सुचित्रा कुतमवार यांनी केले आणि शेवटी गौरव पुंडे सर यांनी आभार प्रदर्शन केले . कार्यक्रमाची सांगता झाली

# माजलगाव शहरामधील तीन दुकाने चोरट्याने फोडली...




माजलगाव..माजलगाव शहरातील गुरुवारी पहाटेच्या वेळेस दोन ॲग्रोसह एक मोटर रिवायडींग ची दुकान फोडल्याची घटना घडली यावेळी अज्ञात चोरट्यांनी दुकानातील कॅश रक्कम दोन जुन्या मोटर लंपास केल्या आहे माजलगाव शहरातील जुना मोंढा त असणारी श्रीनिवास ॲग्रो एजन्सी स्वप्निल रामेश्वर सवादे यांच्या दुकानाचे शटर तोडून दुकानात असलेल्या गल्ल्यामधून 9 600 लंपास केले तर माऊली प्रल्हाद माने यांच्या शिवशंभू ॲग्रो एजन्सी दुकानाचे शटर तोडून दुकानातील गल्ल्यांमध्ये असणारे 18000 कॅश लांबवले मिर्झा अल्ताफ हुसेन बॅग यांच्या किसान वर्कशॉप मोटर रिवायडींग दुकानाचे शटर तोडून जुन्या पाण्याच्या तीन मोटरी मिर्झा अल्ताफ हुसेन बॅग मोटर रिपेरिंग दुकान तीन जुन्या मोटर लंपास केल्या असा अज्ञात चोटाने तीन दुकानातील जवळपास 50 हजार रुपये लंपास केले आहे चोरटे चोरी करत असताना सीसीटीव्ही कॅमेरे मध्ये कैद आहेत माजलगाव शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे दरम्यान पोलिसांकडून अज्ञात चोरट्या विरोधात तपास मोहिमा सुरू आहे

# मानवी हक्क अभियान आयोजित साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जन्मोत्सवास हजारोच्या संख्येने उपस्थित रहा : रमेश गवळी यांचे आवाहन

## ॲड.बाळासाहेब आंबेडकर, प्रा.डॉ.मिलिंद आवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन

माजलगाव / प्रतिनिधी: तळागाळातील समाजाच्या तरुणांनी डॉक्टर, वकील, पोलीस, कलेक्टर झाले पाहिजे ही संकल्पना मनी बाळगून समस्त दलित चळवळीच्या एकेकाळी पाठीचा कणा राहिलेल्या दिवंगत कर्मवीर एकनाथरावजी (जीजा) आवाड यांच्या विचार धारेचा समाज घडविण्याचा वसा अंगीकृत करून समाजाला समविचारी विचार धारेशी जोडण्याचे काम करत असलेले मानवी हक्क अभियानचे अध्यक्ष प्रा.डॉ. मिलिंद आवाड यांच्या मार्गदर्शनाखाली मानवी हक्क अभियान बीड जिल्हा शाखा माजलगाव आयोजित लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जन्मोत्सव सोहळा १ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता वैष्णवी मंगल कार्यालय माजलगाव येथे पार पडत आहे.या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक अध्यक्ष ॲड.बाळासाहेब आंबेडकर भूषवणार आहेत. तर उद्घाटक म्हणून दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे प्राध्यापक तथा मानवी हक्क अभियानचे अध्यक्ष डॉ. मिलिंद आवाड हे असणार आहेत.तरी माजलगाव तालुक्यातील सर्व समाज बांधवांनी या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक रमेश गवळी यांनी केले आहे.



या कार्यक्रमासाठी आमदार प्रकाश दादा सोळंके, मा.आ मोहनराव सोळंके , मा.आ.राधाकृष्ण होके पाटील , मा.आ. डी.के. देशमुख, मोहनराव जगताप, बाबुराव पोटभरे , ओमप्रकाश शेटे, जयसिंग सोळंके , जयदत्त नरवडे,सचिन उजगरे, उमेश काका मोगरेकर,प्रा.अर्जुन तनपुरे, नितीन दादा नाईकनवरे, श्रीहरी मोरे , सहाल भैय्या चाऊस, नानासाहेब घोडके, प्रभाकर साळेगावकर ,धम्मानंद साळवे, अरुणराव राऊत ,अविनाश तात्या जावळे , डॉ. ज्ञानेश्वर गिलबीले ,डॉ. प्रकाश आनंदगावकर, दयानंद स्वामी , शिवाजी सुतार, डॉ. दिनकर मस्के अरुण इंगळे, कचरु तात्या खळगे, मनमोहन कलंत्री ,कॉ. दत्ता डाके, तुकाराम येवले ॲड. तथागत कांबळे , मोहन जाधव ,गंगाभिषण थावरे,भिमराव नाडे,आंकुश जाधव,अजय शिंदे,विजय दादा साळवे,ॲड. नारायण गोले,भारत तांगडे ,ॲड. डोंगरदिवे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. मानवी हक्क अभियान च्या सर्व कार्यकर्ते, समाज बांधवांनी या सोहळ्यास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक रमेश गवळी यांनी माध्यमाद्वारे केले आहे.

# आनंदगाव येथील रहिवासी गणेश गायकवाड यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन



केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील आनंदगाव येथील रहिवाशी गणेश संभाजी गायकवाड वय ५८ वर्ष यांचे हृदयविकाराचा तीव्र धक्क्याने बुधवार सायंकाळी हैद्राबाद येथे दुःखद निधन झाले. त्यांच्यावर आनंदगाव येथील शेतामध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले,दोन मुली,चार भाऊ,जावई असा मोठा परिवार आहे.बप्पा म्हणून ते सर्वपरिचित होते.ते माजी सरपंच ज्ञानेश्वर गायकवाड,बाबासाहेब गायकवाड यांचे बंधू होत त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच परिसरावर शोककळा पसरली आहे.

# जोगेश्वरी त नागपंची उत्साह

गणेश हिरवे मुंबई प्रतिनिधीजोगेश्वरी पूर्व मुंबई येथील श्री समर्थ विद्यालय संचालित श्रीमती लक्ष्मीबाई वळंजू प्राथमिक शाळेत नागपंचमी चा सण मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते गणेश हिरवे यांच्या हस्ते द्वीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.प्राथमिक च्या विद्यार्थ्यांनी गजानन तळेकर, नितीन मंडलिक आणि पूर्व प्राथमिकच्या प्रमुख प्रियंका नारकर यांच्या मार्गदर्शनाखाली एका वर्ग खोलीत नागपंचमी सणाची तयारी करीत कागदावर




काढलेली नागाची चित्र, वारूळ, मातीचा नाग आदींनी ती खोली सजवली होती. लाह्या दूध फुलं वाहून उपस्थित विधार्थी शिक्षक आणि मान्यवरांनी नागदेवतेची पूजा



केली.तळेकर आणि अतिथी गणेश हिरवे यांनी विद्यार्थ्यांना नागपंचमी का साजरी करतात तसेच भारतीय संस्कृतीत सण उत्सव यांचे महत्व तसेच ते का केले जातात याचे महत्व ओळख सांगितली.या शाळेत





येणारी बहुतांश मुलं ही आरे कॉलनी येथील आदिवासी पाड्यातुन येणारी आहेत आणि अभ्यासात व खेळात हुशार आहेत असे प्राथमिकच्या मुख्याध्यापिका सुनीता निंबाळकर यावेळी म्हणाल्या.

# परभणीच नाही, तर मराठवाड्यासाठी विकासाचे नवे पर्व

## पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांची प्रतिक्रिया छत्रपती संभाजीनगर - परभणी रेल्वे मार्गाला केंद्राची अंतिम मंजुरी

परभणी - ङ्छत्रपती संभाजीनगर ते परभणी या रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणाला केंद्राची अंतिम मंजुरी मिळाली, ही केवळ परभणी जिल्हाच नाही तर संपूर्ण मराठवाड्यासाठी आनंदाची बातमी असून मराठवाड्याच्या विकासाचा महत्त्वाचा टप्पा ओलांडणारी देखील आहे. जे स्वप्न गेली अनेक वर्षे मराठवाडावासियांनी पाहिले होते, ते मोदी सरकारच्या माध्यमातून आता पूर्ण होत आहेफ अशी प्रतिक्रिया राज्यमंत्री आणि परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिली. केंद्रीय मंत्रीमंडळाच्या कॅबिनेट बैठकीत छत्रपती संभाजीनगर ते परभणी या रेल्वेच्या दुहेरी मार्गाला अंतिम मंजुरी मिळाली असून यासाठी २,१७९ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. या रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणासाठी पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी स्वतः केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. याच पाठपुराव्याला यश मिळाले



असून १७७ किलोमीटरचा दुहेरी मार्ग साकारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पालकमंत्री श्रीमती साकोरे बोर्डीकर पुढे म्हणाल्या, मया मार्गासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून केंद्र सरकारकडे केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मनापासून धन्यवाद व्यक्त करते. आता या मंजुरीमुळे दुहेरी मार्ग प्रत्यक्षात साकारणार असून छत्रपती संभाजीनगर ते परभणी यादरम्यान रेल्वे गाड्यांची संख्या वाढणार आहेफ ङ्दुहेरीकरणाचा फायदा केवळ नियमित प्रवाशांनाच नाही, तर शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी, व्यावसायिक आणि मराठवाड्यातील उद्योगांनाही होणार आहे. शिवाय रेल्वे गाड्यांची संख्या वाढल्यामुळे संपूर्ण मराठवाड्याची कनेक्टिव्हिटी आणखी मजबूत होण्यास मदत होणार आहेफ, असेही पालकमंत्री श्रीमती साकोरे बोर्डीकर म्हणाल्या. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मराठवाड्याच्या विकासाला सातत्याने प्राधान्य देत असून मराठवाड्यातील पायाभूत सुविधांच्या सक्षमीकरणासाठी कटिबद्ध असल्याची आणखी एक पावती आहे. विशेष म्हणजे या मंजुरी प्रक्रियेत देवेंद्रजींचा पाठपुरावाही अतिशय महत्त्वाचा ठरला. मराठवाड्याच्यावतीने मी केंद्र सरकार आणि राज्यसरकारला मनापासून धन्यवाद देते, असेही पालकमंत्री श्रीमती साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर

शुक्रवार १ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



# ई-रेशन कार्ड मोफत, तरीही ई-सुविधा केंद्रांकडून शंभर रुपयांची सर्रास लूट!

# २० रुपयांच्या प्रिंटसाठी १०० रुपये? तहसील कार्यालयासमोरील एजंटांचा गोरखधंदा खुलेआम सुरू!



बीड –सामान्य जनतेसाठी मोफत उपलब्ध असलेली 'ई-रेशन कार्ड' सेवा ही आता काही दुकानदार आणि ई-सुविधा केंद्र चालकांसाठी कमाईचं साधन बनली आहे. बीड शहरात ई-रेशन कार्ड मिळवण्यासाठी केवळ २० रुपये अधिकृत खर्च असूनही अनेक नागरिकांकडून १०० रुपयांपर्यंत वसुली केली जात आहे. तहसील कार्यालयासमोर लुटीचं साम्राज्य बीड तहसील कार्यालयासमोरील अनेक दुकानदारांनी 'डिजिटल सेवा'च्या नावाखाली सरकारी सुविधा देतानाच सामान्य नागरिकांना गंडवण्याचा उद्योग मांडला आहे. केवळ ई-रेशन नाही, तर जात प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी दाखला यांसारख्या कागदपत्रांसाठी देखील दुपटी-तिपटीने रक्कम घेतली जात आहे.

## वीस रुपयाची प्रिंट – पण घेतात शंभर!

अधिकाऱ्यांचा यात वाटा आहे का? ई-रेशन कार्डाची प्रिंट अवघ्या २० रुपयांत उपलब्ध, तरीही नागरिकांकडून १०० रुपये वसूल! तहसील कार्यालयासमोरीलदुकानदारांचा खुलेआम गोरखधंदा ...आणि अधिकारी गप्प का? हे सर्व त्यांच्या माहितीत असूनही कारवाई होत नाही,म्हणजेच प्रश्न उभा राहतो – "दुकानदार + अधिकारी = लूट सुरूच?" सामान्य जनतेला माहित नाही, म्हणूनच त्यांच्यावर शंभर रुपयांची जबरदस्तीची फसवणूक.

## तहसील कार्यालयासमोरच सुरू आहे नागरिकांची सर्रास फसवणूक!

शासनाने मोफत उपलब्ध करून दिलेलं ई-रेशन कार्ड केवळ २० रुपयांत प्रिंट होणाऱ्या कार्डासाठी घेतात तब्बल १०० रुपये गोरगरीब, अशिक्षित नागरिकांना माहितीच्या अभावाचा गैरफायदा ई-सुविधा केंद्रांमधून सर्रास वसुली – कोणताही लेखी दरपत्रक नाही तहसील प्रशासनाकडून दुर्लक्ष – दुकानदार मोकाट

## नागरिकांचे म्हणणे:

"रेशन कार्ड साठी अर्ज करताना सांगितलं गेलं की शंभर रुपये लागतात. आम्हाला वाटलं की हेच अधिकृत शुल्क आहे. पण नंतर समजलं की फक्त २० रुपयातच मिळतं," – असे एका नागरिकाने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले.

## प्रशासनाकडून दुर्लक्ष?

या सर्व गोष्टी प्रशासनाच्या नजरेत असूनही, कुणीच कारवाई करत नाही. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी जर थोडंसं लक्ष दिलं, तर सामान्य माणसाची लूट थांबू शकेल. पण सध्या सर्व काही 'मिळून'च चालल्याचं चित्र दिसत आहे

# बप्पासाहेब घुगे यांची बीड जिल्हा सरचिटणीस पदी फेरनिवड कार्यकर्त्यांत आनंदाची लाट

बीड - राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते बप्पासाहेब घुगे यांची बीड जिल्हा सरचिटणीसपदी पुन्हा एकदा फेरनिवड करण्यात आली आहे. त्यांच्या या नियुक्तीमुळे जिल्हाभरातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत असून, कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.बप्पासाहेब घुगे हे जिल्ह्यातील एक तडफफदार, प्रामाणिक व सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर नेहमीच धडपड करणारे नेतृत्व म्हणून ओळखले जातात. त्यांच्या नेतृत्वात पक्ष अधिक बळकट होईल, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.



# भागूजीराव ढेकळे विद्यालयात स्व.सोनाजीराव क्षीरसागर यांचा स्मृतिदिन साजरा



गेवराई दि.३१(प्रतिनिधी):- तालुक्यातील पाडळिसंगी येथील कृषी पंडित भागुजीराव ढेकळे म ाध्य. व उच्च माध्य. विद्यालयात कर्मयोगी स्व.सोनाजीराव (नाना) क्षीरसागर यांचा स्मृतिदिन बुधवार दि.३० रोजी साजरा करण्यात आला. यावेळी प्रथम नानांच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयाचे प्राचार्य थिटे ए.एस. यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रा. अरुण कळासे , पर्यवेक्षक राजेंद्र रांजवण यांनी नानांच्या कार्यावरती प्रकाश टाकला. याप्रसंगी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. संशोधन करण्याचे आवाहन करण्यात आले या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी चरक संहितेतील महत्त्वपूर्ण सूत्रांचे पठण केले आणि आयुर्वेदाची परंपरा पुढे नेण्याचा संकल्प घेतला.



येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयातील विद्यार्थिनी दिव्या जगताप व रश्मी पुजदेकर या विद्यार्थिनींनी बीड येथे दिनांक ३० रोजी महाराष्ट्र शास-नाच्या वतीने आंतरमहाविद्यालयीन योगासन स्पर्धेत (गोल्ड मेडल इन महाराष्ट्र योगासना फेडरेशन कॉम्पिटिशन जिल्हास्तरीय महाराष्ट्र योगासन फेडरेशन कॉम्पिटिशन स्पर्धा) गोल्ड मेडल्स प्राप्त केले. याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या हस्ते बुके देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या विद्यार्थिनींना इंग्रजी विभागाचे विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. बालाजी नवले, प्रा. अशोक शिनगारे, उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# बीड मधील सुप्रसिद्ध वकील निळकंठ बारगजे सर यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

प्रतिनिधी बीड जिद्द ,चिकाटी आणि अभ्यासू वृत्तीने , आयुष्याच्या प्रत्येक वळणावर यशस्वी झालेले आमचें मार्गदर्शक बीड येथील प्रसिद्ध वकील निळकंठ बारगजे सर, आपला वाढदिवस साजरा झाला. आपणास वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा!आपल्या कर्तृत्वाने आपण आपले वर्तमान, भविष्य निर्माण केलेत. त्याबद्दल आम्हाला आपला सार्थ अभिमान आहे. आपण आपल्या प्रेमळ व मितभाषी स्वभावाने अगणित मित्रपरिवार उभा केला




आहे. सुख -दुःखाच्या प्रसंगी आपण सर्वांना आधार देण्यासाठी सतत आघडीवर असतात. आपला मनमिळावू स्वभाव, कामाची चिकाटी , जिद्द, कार्यतत्परता या गुणामुळे आपण नेत्रदिपक प्रगती केली आहे. आपल्या मित्र परिवाराला तुम्ही एक मजबुत आधारस्तंभ लाभलाआहात .आयुष्यातले सगळे क्षण आठवणीत राहतात अस नाही. पण काही क्षण असे असतात जे विसरु म्हणताही विसरता येत नाहीत. हा वाढदिवस म्हणजे त्या अंनत क्षणातला असाच एक क्षण.. हा क्षण म नाला एक वेगळ समाधान देईलच. पण.. आमच्या शुभेच्छनी वाढदिवसाचा हा क्षण एक मसणङ्क होऊ दे हिच सदिच्छा..! वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देताना ॲड. ॲड गहिनीनाथ केकान सर, ॲड दिपक खाडे सर ॲड दिपक रोटे सर, शंशाक धन्वे, बिवरे सर,शेख शरिफ भाई,वराटसर ,सामाजिक कार्यकर्ते तथा लोकशाही पत्रकार संघाचे बीड शहर उपाध्यक्ष अशोक दादा ढोले पाटील ,सौरभ मुंडे,सह आदी मान्यवरांच्या उपस्थितीत वाढदिवस साजरा करण्यात आला

# अब ब ब ब ब ब ब ब ब ब विहीरच गायब..

# अंबाजोगाई शहरातील पुरातन विहीर वाचली पाहिजे

अंबाजोगाई : प्रतिनिधीअंबाजोगाई शहरात सध्या खूप मोठ्या प्रमाणात महाराष्ट्र बँकेसमोरील पुरातत्त्व विभागाच्या विहिरीवर नगरपालिका प्रशासनाने केलेल्या नियमबाह्य अतिक्रमण काढण्यात यावे यासाठी आंदोलने सुरू आहे त्यातील पहिला टप्पा हा बीड जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन सुरू करण्यात आला त्याच्याच पुढे अंबाजोगाई उपजिल्हाधिकारी मुख्याधिकारी अंबाजोगाई यांना वेळोवेळी निवेदन देण्यात आली तरीही विहिरीवर केलेले अतिक्रमण निगरगट्ट प्रशासन काढण्यास तयार होत नाही हे आंदोलकांच्या लक्षात आल्यावर अंबाजोगाई नगरपरिषदेवर सर्वपक्षीयांच्या वतीने भव्य मोर्चा काढण्यात आला त्यालाही प्रशासनाने दात दिली नाही निवेदन कर्त्यांना पूर्व उडवींची उत्तरे देण्यात



आली आणि लेखी स्वरूपात नगर परिषदेचा महसूल वाढण्यासाठी ही जागा अधिग्रहण करण्यात आली आहे असे पत्र दिले परंतु आंदोलनकर्त्यांचे याच्यावर समाधान झाले नाही म्हणून आंदोलनकर्त्यांनी भीक म ागून आंदोलन करून अंबाजोगाई नगर परिषदेला पंधरा हजार पाचशे त्रेपन्न रुपये ५० पैसे निषेध म्हणून दिले तरीही संबंधित विहिरीवरील अतिक्रमण निघाले नाही विशेष करून या दुकानात मोठे किराणा होलसेल दुकान टाकले अंबाजोगाई शहरामध्ये असे शेकडो भूखंड आहेत की ते हातावर पोट भरणाऱ्या लोकांना देता आले असते परंतु निगरगट्ट प्रशासनाने हे भूखंड आपल्या म र्जीतील काही लोकांना कमी किमतीमध्ये देऊन नगरपालिकेची लूट सुरू केलेली आहे गरिबांना एक आणि श्रीमंतांना एक न्याय अशी भूमिका अंबाजोगाई नगर परिषदेच्या प्रशासनाची झाली आहे त्यामुळे लोक जनशक्ती पार्टीच्या वतीने अंबाजोगाई नगरपरिषद प्रशासनाच्या विरोधात दिनांक ३० ७ २०२५ पासून आमरण उपोषणास बसण्यात आले आहे ........उपोषण करते :अशोक काळे (पाटील) लोक जनशक्ती पार्टी युवा बीड जिल्हा अध्यक्ष




This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email :

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com